# खरीप विशेष

## कृषी सल्ला : राहुरी

### तूर

- **फांद्या वाढीची अवस्था**
- पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसल्यास, नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टीन (३०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

### मुग, उडीद

- **साठवणूक**
- शेंगा खळ्यावर चांगल्या वाळविल्यानंतर काठीच्या सहाय्याने झोडपून दाणे वेगळे करावेत. साठवणीपूर्वी उडीद ५ ते ६ दिवस उन्हात वाळवून नंतर पोत्यात किंवा कोठीत साठवावे. साठवण कोंदट किंवा ओलसर जागेत करू नये. शक्य झाल्यास धान्यास १ टक्का करंज किंवा एरंडीचे तेल चोळावे किंवा कडुनिंबाचा पाला (५ टक्के) धान्यात मिसळून धान्य साठवावे. यामुळे धान्य साठवणुकीतील किडींपासून उडीदाचे संरक्षण होते.

### भुईमूग

- **पक्वतेची अवस्था**
- भुईमुगा पिकाचा पाला पिवळा दिसू लागल्यावर आणि शेंगाचे टरफल टणक बनून आतील बाजूने काळसर दिसू लागताच काढणी करावी. काढणीनंतर मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी.

### ऊस

- **वाढीची अवस्था**
- सहा ते आठ आठवड्यांच्या आडसाली को- ८६०३२ या वाणाकरीता (५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश) शिफारशीत खते मात्रेपैकी ४० टक्के नत्र खताची (४३४ किलो युरिया प्रति हेक्टरी) दुसरी मात्रा द्यावी.
- इतर जातींसाठी (४००:१७०:१७० किलो नत्र स्फुरद व पालाश) शिफारशीत खते मात्रेपैकी ४० टक्के नत्र खताची (३४७ किलो युरिया प्रति हेक्टरी) दुसरी मात्रा द्यावी.
- खतमात्रा देताना सहा किलो युरियासाठी एक किलो निंबोळी पेंडची भुकटी चोळून द्यावी.

### कापूस

- **फुलोरा ते बोंड वाढीची अवस्था**
- जमिनीतील ओलावा टिकून ठेवण्यासाठी आंतरमशागतीची कामे आणि तण नियंत्रणासाठी कोळपणी, खुरपणी किंवा तणनाशकाचा वापर करावा.
- गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. मावा, तुडतुडे इत्यादी रस शोषणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा अझाडिरेक्टीन (३०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर पाणी प्रमाणे हवामान कोरडे असताना फवारणी करावी.

### कांदा

- **लागवडीची अवस्था**
- रांगडा हंगामासाठी ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात कांद्याचे बी पेरून रोपे तयार करून घ्यावी. त्यांनी पुनर्लागवड ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करावी.
- एक एकर कांदा लागवडीसाठी दोन गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. त्यासाठी दोन ते तीन किलो बी पुरेसे होते.
- पेरणीपूर्वी प्रति किलो बियाणांस कार्बेन्डाझिम २ ग्रॅम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरिडी वापरून जमिनीत मिसळावे.

०२४२६ -२४३२३९
(प्रमुख, कृषिविद्या विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी.)

कुपन क्र. ९६

एक एकर कांदा लागवडीसाठी किती क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी ?

उत्तर: